डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
अर्थ प्रशासन विभाग
पी.ओ.कृषिनगर,अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)
नियंत्रक ईमेल :comptroller@pdkv.ac.in दुरध्वनी:-०७२४-२२५८४६९

जा.क./अप्रवि/परिपत्रक/1725/2022 दिनांकः-18 /10/2022

वाचा : वित्त सल्लागार कृषि परिषद यांचे पत्र क. मकृप/लेखा-१/ स्थानिलेप/ /२०२२ दिनांक ०६.१०.२०२२

# परिपत्रक

मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे राज्यातील चारही कृषि विद्यापीठांच्या लेखा परिक्षणाबाबत दिनांक १२.०९.२०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत प्राप्त निर्देशान्वये वित्त सल्लागार कृषि परिषद पुणे यांनी संदर्भांकित पत्रान्वये राज्यातील चारही कृषि विद्यापीठांच्या नियंत्रकांना बैठकीतील मुद्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

उपरोक्त संदर्भाकिंत पत्राच्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, त्यांच्याशी संबंधित कार्यालयातील जे अधिकारी /कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांची सेवापुस्तके त्यांच्या सेवानिवृत्ती दिनांकापुर्वी सहा महिने अगोदर, पडताळणीकरीता जिल्हा लेखा परिक्षा अधिकारी स्थानिक निधी लेखा अकोला यांचे कडे पाठवुन द्यावीत. लेखा परिक्षा अधिकारी यांनी ज्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या बाबत सेवानिवृत्ती प्रकरणे निकाली काढण्यास नाहरकत दिली अशाच कर्मचा-यांची/अधिका-यांची प्रकरणे निकाली काढण्याकरीता पुढे पाठवावीत. अन्य प्रकरणांबाबत लेखा परिक्षा अधिका-यांनी दिलेल्या हरकतींच्या बाबींवर कार्यवाही पुर्ण करून पुन:श्च लेखा परिक्षा अधिका-यांना नाहरकतीकरीता सादर करावीत.

सेवानिवृत्ती धारकांना त्यांचे लाभ वेळेवर मिळण्याकरीता संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी सेवानिवृत्ती प्रकरणे वेळेतच लेखा परिक्षा अधिकारी यांचे कडुन तपासुन घ्यावीत अन्यथा अतिप्रदान, अनियमितता व त्या अनुषंगाने घडणारी न्यायालयीन प्रकरणे या सर्वाच्या बाबतीत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी जबाबदार असतील याची कृपया नोंद घ्यावी.

नियंत्रक,
डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला

प्रतः
१) मा. कुलगुरू, डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला यांना माहितीस्तव सविनय सादर
२) वित्त सल्लागार, कृषि परिषद पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) जिल्हा लेखा परिक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, अकोला यांना माहितीस्तव तथा आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.
४) कुलसचिव, डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला यांना माहितीस्तव सादर.
५) सर्व आहरण व संवितरण अधिकारी / कार्यालय प्रमुख, डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
६) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला. यांना विद्यापीठाच्या संकेत स्थळावर पसिद्ध करण्या करिता.